# मराठी भाषा व साहित्याचा अभ्यास, आजचे विद्यार्थी आणि एआयमुळे निर्माण झालेल्या संधी, आव्हाने व उपाययोजना

**प्रा. अभय सुभाष जोशी**
*सहयोगी प्राध्यापक, मराठी विभाग गोपिकाबाई सीताराम गावंडे महाविद्यालय, उमरखेड, जि. यवतमाळ*
*joshi@gsgcollege.edu.in*

**प्रस्तावना**

'व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्वामध्ये आमूलाग्र बदल घडवून आणते ते शिक्षण', अशी शिक्षणाची एक व्याख्या सांगितली जाते. प्राचीन काळापासून शिक्षण पद्धतीमध्ये वेळोवेळी बदल घडवून आणल्या गेले आणि असे करताना ते काळानुरूप अद्ययावत केल्या गेले. एकूणच भारतीय शिक्षण पद्धतीचा विचार करत असताना आपण हे लक्षात घेतले पाहिजे की, यामध्ये काळानुरूप बदल करत असताना बदलत्या युगाची आव्हाने समर्थपणे पेलू शकणारी नवी सक्षम पिढी घडवत असताना, शिक्षण प्रक्रियेमध्ये आधुनिक काळानुसार बदल केल्या गेले आणि ते स्वीकारल्याही गेले, हे अतिशय महत्त्वाचे आहे. स्वातंत्र्यानंतर वेगवेगळया धोरणानुसार आपण या शिक्षण व्यवस्थेमध्ये काळानुरूप बदल झालेले अनुभवले आहेत. आजचे युग हे विज्ञान आणि माहिती तंत्रज्ञानाचे युग आहे. विज्ञान तंत्रज्ञानाने आपल्या समाजामध्ये मोठीच क्रांती घडवून आणली, हे आपण अनुभवतो आहोत. एका बाजूला आपले जगणे सोपे आणि सुसह्य केले आहे तर दुसऱ्या बाजूला विज्ञान तंत्रज्ञानाच्या चुकीच्या वापरामुळे त्याचे दुष्परिणामदेखील समाजाने कशाप्रकारे भोगले आहेत, हेदेखील आपण पाहिले आहे. संगणक - इंटरनेटने आपल्या जीवनामध्ये प्रवेश केल्यानंतर जी डिजिटल क्रांती नंतर घडून आली, ती सगळी आपण 'याची देही याची डोळा' पाहत, अनुभवत आहोत आणि या क्रांतीला समजून घेत पुढील वाटचाल करीत आहोत. मागील काही वर्षांपासून आपण 'एआय' म्हणजे 'कृत्रिम बुध्दिमत्ता' हे शब्द ऐकत आहोत. 'एआय' किंवा 'कृत्रिम बुद्धिमत्ता' हिने आजचे संपूर्ण समाजजीवन केवळ बदलून टाकले नसून एक प्रचंड मोठी उलथापालथ घडवून आणली आहे किंबहुना फार मोठी क्रांतीच घडवून आणली आहे, असे म्हटले तर ते वावगे ठरणार नाही. आज शेतीपासून तर औद्योगिक क्षेत्रापर्यंत 'एआय'चा प्रभावी वापर सुरू झालेला आहे. याला शिक्षणक्षेत्र कसे बरे अपवाद असणार? भाषा आणि मानवी जीवन यांचा एक निकटचा संबंध आहे, हेही आपणास माहीत आहेच. अलीकडच्या काळात भाषा, मराठी भाषा आणि साहित्याच्या अध्ययन अध्यापनामध्येसुद्धा 'एआय' म्हणजेच 'कृत्रिम बुद्धिमत्ते'चा वापर करण्यात येत आहे, असे आपल्याला दिसून येते. आजच्या नवीन पिढीतील विद्यार्थी आपल्या भाषा आणि साहित्याच्या अभ्यासामध्येसुद्धा 'एआय' म्हणजेच 'कृत्रिम बुद्धिमत्ते'चा प्रभावीपणे वापर करताना दिसतात. ही नव्या पिढीला मिळालेली संधी आहे. परंतु असे असेल तरी या संदर्भात याने निर्माण केलेली काही आव्हाने यांचासुद्धा यासंदर्भात आपल्याला विचार करणे क्रमप्राप्त ठरते. याच अनुषंगाने सदरच्या शोधनिबंधामध्ये आपण एकूणच भाषा, मराठी भाषा व साहित्याच्या अभ्यासासाठी केल्या जाणाऱ्या 'एआय'च्या अती वापरामुळे निर्माण झालेली आव्हाने व उपाययोजना यांचा देखील विचार करणार आहोत.

**मराठी भाषा व साहित्याचा अभ्यास, आजचे विद्यार्थी आणि एआयमुळे निर्माण झालेल्या संधी :-**

नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० राबवत असताना प्राथमिक ते उच्च शिक्षणापर्यंत, शिक्षण क्षेत्राशी निगडीत आपण सर्व जण सजग राहून आणि सज्जतेने आपल्या शिक्षण व्यवस्थेमध्ये काही अनुकूल बदल करण्याचा प्रयत्न करीत आहोत. अर्थात याचे निष्कर्ष आणि सुयोग्य परिणाम मिळण्यासाठी आपल्याला आणखी काही वर्षे वाट पाहावी लागणार आहे, हेदेखील तितकेच खरे आहे. कारण कोणतीही एखादी नवीन पद्धती स्वीकारल्यानंतर तिचे परिणाम आपल्याला लगेच लवकर कळत नाहीत आणि दिसतही नाहीत. असे असताना दुसऱ्या बाजूला 'एआय' म्हणजेच 'कृत्रिम बुद्धिमत्ते'ने आपल्या एकूणच समाज जीवनामध्ये झालेली क्रांतीदेखील आपल्याला विचारात घ्यावी लागणार आहे.

प्रत्येकच नवीन पिढी ही जुन्या पिढीपेक्षा जास्त बुद्धिमान, विचक्षण आणि आधुनिक असते, हेदेखील सर्व विदितच आहे. भाषा, मराठी भाषा आणि मराठी साहित्याच्या अभ्यासाचा विचार करत असताना आपल्याला अनेक मुद्दे लक्षात घ्यावे लागतात.

**मराठी भाषा आणि मराठी वाङ्मयाच्या अभ्यासासाठी विद्यार्थी वापरत असलेली विविध एआय साधने :-**

शैक्षणिक कामासाठी विद्यार्थी खालीलप्रमाणे 'एआय' साधने वापरत आहेत, असे दिसते. विशेषतः कथा, कादंबरी, नाटकाचे कथानक समजून घेण्यासाठी आणि वाङ्मयीन मूल्यमापन करण्यासाठी तसेच विविध कवींच्या कवितांचे रसग्रहण करण्यासाठी व इतर शैक्षणिक कामासाठी सध्याचे विद्यार्थी विविध 'एआय' साधनांचा वापर करीत आहेत.

ChatGPT, Google Gemini, Claude → निबंध, प्रोजेक्ट, भाषांतर, प्रश्नोत्तर.

Grammarly AI → लिखाण सुधारणा, व्याकरण दुरुस्ती, निबंधांचे फीडबॅक.

-Grammarly विद्यार्थ्यांसाठी

-डेव्हलपर / तंत्रज्ञान क्षेत्र
GitHub Copilot X → कोडिंगसाठी ऑटो-कंप्लिशन व सुचवणी.
Mistral Devstral → कोडिंग-विशिष्ट ओपन मॉडेल.
Lumio AI → एकाच ठिकाणी ChatGPT, Gemini, Claude इ. सर्व मॉडेल्स वापरण्याची सोय.
-क्रिएटिव्हिटी व कला
Midjourney V6, DALL·E, Nano Banana (Gemini) → फोटो व चित्रनिर्मिती.
-Nano Banana – Google चं इमेज एडिटिंग टूल
Veo 3 (DeepMind) → 4K व्हिडिओ जनरेशन.
Synthesia → प्रशिक्षण/मार्केटिंग व्हिडिओ बनवणे.
Riffusion → संगीत निर्मिती.
-घरगुती व वैयक्तिक वापर
Ollie व Maple → आहार नियोजन, दिनचर्या व्यवस्थापन, घरातील कामांची आखणी.
-AI meal planning apps
Plaud NotePin → आवाजातून लेखन/नोंदी तयार करणे.
Gemini Live (मोबाईलवर) → नैसर्गिक आवाजात AI संवाद.

थोडक्यात सांगायचे तर नवीन पिढी ही 'एआय' साधनांचा वापर फक्त शैक्षणिक वा व्यावसायिक वापरापुरता मर्यादित ठेवत नाही, तर दैनंदिन जीवनात आहार, घरकाम, छंद, कला, संगीत यातही वापर करून घेत आहे. त्यामुळे एआय ही "फक्त टेक्नॉलॉजी" नसून जीवनशैलीचा भाग बनत चालली आहे. 1

महाविद्यालयीन विद्यार्थी 'मराठी भाषा' आणि 'मराठी वाङ्मया'च्या अभ्यासासाठी 'एआय' साधनांचा खूप उपयोग करून घेऊ शकतात. भाषा शिक्षण, साहित्य अभ्यास, लेखन, संशोधन इ. साठी काही उपयुक्त 'एआय' Tools व त्यांचा उपयोग:-

**मराठी भाषा शिकणे व सराव :-**

१. ChatGPT / Google Gemini / Claude
- व्याकरण समजावून घेणे, अवघड वाक्यरचना समजणे.
- मराठी वाक्यांचे इंग्रजी/हिंदी भाषांतर करून तुलना करता येते.
- शंका विचारल्यावर त्वरित उत्तर.

२. Google Translate + AI सुधारणा (DeepL सारखी)
- नवशिक्या विद्यार्थ्यांना भाषांतर सरावासाठी मदत.
मराठी → इंग्रजी → मराठी करून चुका ओळखता येतात.

३. Speech-to-Text Tools (उदा. Google Speech AI, Microsoft Azure Speech)
- उच्चार सुधारण्यासाठी.
-विद्यार्थ्यांनी वाचन केल्यास थेट टेक्स्ट मिळतो, त्यामुळे चुका दुरुस्त करता येतात.
- मराठी वाङ्मय अभ्यास (कथा, कविता,कादंबरी, नाटक इ.)

४. ChatGPT / Gemini (रसग्रहणासाठी)
-एखाद्या कवितेचे रसग्रहण, अभंगाचा अर्थ वा विश्लेषण मिळवता येते.
-कथानकातील व्यक्तिरेखा, कथानकाची रूपरेषा, विषयांची मांडणी विद्यार्थ्यांना सोप्या भाषेत समजते.

५. AI Summarizers (उदा. ScholarAI, Elicit, Perplexity AI)
दीर्घ लेख, संशोधन निबंध यांचे सारांश मराठीत मिळू शकतात.
"याची रूपरेषा दे", "मुख्य मुद्दे लिहा" असे प्रश्न विचारल्यास झटपट माहिती.

६. OCR + Translation Tools (Google Lens, Transkribus इ.)
-जुन्या मराठी वाङ्मयाचा (ग्रंथ, पोथ्या, वर्तमानपत्रे) स्कॅन करून डिजिटल टेक्स्टमध्ये रूपांतर.
-अभ्यासकांना दुर्मिळ साहित्य सहज उपलब्ध.
-लेखन व अभ्यास निबंध तयार करणे :-

७. Grammarly (मराठी Beta + इंग्रजी)
-मराठीत अजून मर्यादित परंतु इंग्रजीतून निबंध लिहून नंतर मराठीत रूपांतर.
-व्याकरण सुधारणा.

८. Quillbot (पॅराफ्रेजिंग Tool)
मराठी वाक्यांचे पुनर्लेखन / शैली सुधारणा.
-विद्यार्थ्यांना एकाच विषयावर विविध पद्धतीने मांडणी करण्याचा सराव होतो.

९. Mind-Map AI Tools (Miro AI, XMind AI)
-एखाद्या कादंबरी किंवा संशोधन निबंधाची रूपरेषा ग्राफिक स्वरूपात मांडता येते.
-व्यक्तिरेखांची जाळी (character web) बनवून साहित्य अभ्यास अधिक रोचक होतो.
-संशोधन व संदर्भ

१०. Perplexity AI
-प्रश्न विचारल्यावर थेट संदर्भांसह उत्तर मिळते.
-संशोधन करताना मराठी वाङ्मयाशी निगडित ताजे संदर्भ शोधणे सोपे होते.

११. ScholarAI / Elicit
-संशोधन निबंध, आंतरराष्ट्रीय जर्नल्समधील लेख वाचणे, त्यांचे सारांश काढणे.
-विद्यार्थ्यांना "AI in Marathi Literature" किंवा "Linguistics" सारख्या विषयांवर संदर्भ मिळतात.
-सर्जनशील लेखन व सादरीकरण

१२. Text-to-Speech AI (उदा. ElevenLabs, Google TTS)
-कविता, नाटक वा वाचन एआय आवाजात ऐकता येते.
-विद्यार्थी आपल्या लेखनाचा "आवाजात अनुभव" घेऊ शकतात.

१३. AI Presentation Tools (Canva AI, Gamma AI, Tome)
-मराठी विषयांवर प्रेझेंटेशन तयार करताना माहिती, चित्रे, डिझाईन सहज मिळतात.
त्याचप्रमाणे विद्यार्थी मराठी भाषा व वाङ्मयाचा अभ्यास करताना 'एआय'चा वापर अशा प्रकारे करू शकतात:

भाषा शिकणे (व्याकरण, भाषांतर, उच्चार)
साहित्य विश्लेषण (रसग्रहण, कथासारांश, व्यक्तिरेखा)
लेखन (निबंध, प्रेझेंटेशन, पुनर्लेखन)
संशोधन (संदर्भ, सारांश, जुनी ग्रंथे OCR करून अभ्यास)
सादरीकरण (आवाज, PPT, Mindmap) २

आजचे विद्यार्थी स्मार्ट मोबाईल फोनचा वापर करत असल्यामुळे आणि त्यांच्या मोबाईल फोनमध्ये ही सर्व 'एआय' साधने सहज उपलब्ध होत असल्यामुळे विद्यार्थ्यांकडून या 'एआय' साधनांचा वापर होणे स्वाभाविकच आहे. त्यामुळेच सध्याच्या काळात विद्यार्थ्यांनी या साधनांचा वापर करणे अपरिहार्य झाले आहे, हेही आपण समजून घेतले पाहिजे. सुप्रसिद्ध उद्योजक व संगणक साक्षरता प्रसारक डॉ. दीपक शिकारपूर यांनी 'कृत्रिम प्रज्ञा साधेल व्यापक प्रसार' या शीर्षकाचा एक लेख लिहिला असून तो दै. तरुण भारत, नागपूरमध्ये नुकताच प्रकाशित झाला आहे. त्यात ते म्हणतात," सध्या अनेक कंपन्या आणि संस्था आपल्या चाटबॉट्समध्ये मराठी भाषेचा समावेश करत असल्यामुळे मराठी भाषिकांना प्रश्नांची उत्तरे मिळवणे सोपे झाले आहे. चॅटजीपीटी, जेमिनी, परप्लेक्ससिटीसारख्या मोठ्या भाषा मॉडेल्समध्ये मराठी मजकूर तयार करण्याची आणि समजून घेण्याची क्षमता विकसित केली जात आहे. यामुळे मराठीत लेख, कथा, कविता आणि इतर मजकूर तयार करणे शक्य झाले आहे. 'एआय'चा वापर करून मराठीत शैक्षणिक साहित्य तयार केले जात आहे." 3 डॉ. दीपक शिकारपूर यांचा हा लेख मुळातून वाचण्यासारखा आहे.

**'एआय'च्या अती वापरामुळे निर्माण झालेली आव्हाने :-**

आज इयत्ता पाचवी ते उच्चशिक्षणापर्यंतचे अनेक विद्यार्थी सध्या विविध 'एआय' साधनांचा वापर करीत आहेत. त्यांच्या अध्ययनासाठी त्यांना या साधनांचा खूप उपयोग होताना दिसतो. मात्र दुसऱ्या बाजूने आपण हे लक्षात घेतले पाहिजे की, 'एआय'च्या या विविध साधनांचा विद्यार्थी अती वापर करत असल्यामुळे त्यांची कल्पनाशक्ती, प्रतिभा, त्यांची नैसर्गिक बुद्धिमत्ता यांना फारशी चालना मिळताना दिसत नाही. ते स्वतःच्या कल्पनाशक्तीचा व बुद्धिमत्तेचा वापर करीत नाहीत. त्याऐवजी ते 'एआय' म्हणजेच कृत्रिम बुद्धिमत्तेवर अवलंबून राहत आहेत. त्यांचे हे अशाप्रकारे परावलंबी होणे हे त्यांच्याच भविष्यासाठी अत्यंत घातक ठरणारे आहे, ही बाबदेखील आपण या निमित्ताने लक्षात घेतली पाहिजे. त्यांच्याजवळ असलेल्या पुस्तके, विविध ग्रंथ अशा हाताळता येणाऱ्या विविध संदर्भ साहित्याचा ते उपयोग करीत नाहीत. ग्रंथालयामध्ये उपलब्ध असलेल्या विविध ग्रंथांचाही आधार घेण्यासाठी आता त्यांची पावले ग्रंथालयाकडे वळत नाहीत. त्यामुळे प्रत्यक्ष ग्रंथांचे वाचन करणे, टिपणे काढणे या बाबी आता दुर्मिळ होत असलेल्या दिसत आहेत. साहजिकच या सगळ्याचा परिणाम म्हणून प्रत्यक्ष ग्रंथ वाचन संस्कृती कमी होईल की काय? असेही वाटते. शिवाय 'एआय'च्या ह्या साधनांचा वापर करण्यासाठी मोबाईल, फोन, संगणक, लॅपटॉप इत्यादी साधनांच्या वापरामुळे त्यांच्या डोळ्यावर व इतरही आरोग्यावर दुष्परिणाम होण्याची शक्यता नाकारता येत नाही. शिक्षण क्षेत्रातील तज्ज्ञ आणि पालकांनीही या बाबीकडे गांभीर्याने पाहणे आवश्यक झाले आहे. आता कुतूहल म्हणून किंवा सहज उपलब्ध आहे म्हणून विद्यार्थी 'एआय'च्या साधनांचा वापर करीत आहेत. मात्र याचे अतिशय गंभीर दुष्परिणाम भविष्यामध्ये आपल्याला दिसू लागतील. मात्र तेव्हा वेळ आणि परिस्थिती हातातून निघून गेलेली असेल, हेही या निमित्ताने सुचवावेसे वाटते.
सारांश, शिक्षणासाठी आणि आपले करिअर घडवण्यासाठी आजचे विद्यार्थी कुतूहल म्हणून आणि सहज उपलब्ध आहेत म्हणून 'एआय'च्या साधनांचा वापर विविध शैक्षणिक कामे, परीक्षा व स्पर्धा परीक्षा इ. अध्ययन कार्यासाठी संदर्भ साधने म्हणून करीत आहेत. तसेच भाषा, मराठी भाषा आणि मराठी वाङ्मयाच्या अभ्यासासाठी आणि इतरही स्पर्धात्मक परीक्षांच्या अभ्यासासाठी विद्यार्थी 'एआय'च्या साधनांचा वापर करीत आहेत. ही त्यांच्यासाठी उत्तम संधी असली तरीदेखील या निमित्ताने निर्माण होणारी शिक्षण क्षेत्रासमोरील आव्हाने आपण आज समजून घेऊन त्यावर कायमस्वरूपी उपाययोजना करणे आवश्यक आहे, हे या निमित्ताने अधोरेखित करावेसे वाटते.

**उपाययोजना :**

शैक्षणिक कामासाठी तसेच परीक्षा आणि स्पर्धात्मक परीक्षांच्या अध्ययनासाठी संदर्भ साधन म्हणून विद्यार्थी आज 'एआय' साधनांचा उपयोग करीत आहेत. अशा वेळी विद्यार्थ्यांना मोबाईल, संगणक आणि इंटरनेट इत्यादींच्या अतिवापराचा डोळे आणि इतर आरोग्यावर होणाऱ्या दुष्परिणामाची जर आपण स्पष्ट कल्पना करून दिली तर विद्यार्थी 'एआय'च्या साधनांचा अतिवापर करणार नाहीत. त्यांच्यावर जास्त अवलंबून राहणार नाहीत. तसेच आपण त्यांना पुस्तके, ग्रंथ आणि ग्रंथालयाचे महत्त्व समजावून सांगितले तर आणि ग्रंथातून अभ्यास करणे, टिपणे काढणे या सर्व बाबींचे महत्त्व समजावून सांगितले तर त्यांची पावले ग्रंथ आणि ग्रंथालयाकडे निश्चितच वळतील असा विश्वास वाटतो. शेवटी ज्ञान मिळवणे हे महत्त्वाचे असते, माहिती मिळवणे महत्त्वाचे असते. तरीदेखील पारंपरिक ग्रंथ वाचनाच्या साह्याने आपण अनेक चांगल्या गोष्टी मिळवू शकतो, हे त्यांना समजावून सांगणे आवश्यक आहे.

तसेच आवश्यक तिथे गरज पडली तरच 'एआय'च्या साधनांचा वापर करण्यास हरकत नाही; हे त्यांना समजावून सांगितल्यास आताचे विद्यार्थी हे निश्चित समजून घेईल, असा विश्वास वाटतो.

**संदर्भ**

1) शिकारपूर डॉ. दीपक, लेख - 'कृत्रिम प्रज्ञा साधेल व्यापक प्रसार' दै. तरुण भारत, नागपूर आवृत्ती, पृष्ठ क्रमांक चार संपादकीय पान, गुरुवार, दि. २१ ऑगस्ट २०२५